# DEOGIRI COLLEGE AURANGABAD

Ppt by
Dr.Prof.Niraj Borse
**Head and Assistant professor**
DEPARTMENT OF DRMATICS

B.VOC

(THEATRE AND STAGE CRAFT)

INDIAN THEATRE

PAPER (XVI)

# तमाशा

गायन, वादन, नृत्य आणि विनोद यांनी युक्त असलेला लोकनाट्याचा एक आविष्कार आहे. तमाशा हा शब्द मूळ अरबी असून, त्याचा अर्थ दृश्य, खेळ वा नाट्यप्रयोग असा आहे. तमाशाचे खेळ(प्रयोग) गावोगाव भरणाऱ्या जत्रांत, उघड्यावर किंवा तंबूंत होत असतात. त्यामुळे प्रयोगाला फारसे नेपथ्य लागत नाही. तमाशात काम करणारी पुरुषपात्रे नेहमीच्याच वेशात असतात, तर स्त्रीपात्रांची वेशभूषा शक्य तितकी आकर्षक व उद्दीपक असते. तमाशातले गायक. वादक, सुरत्ये (सुरत्या= गायनात सूर देऊन साथ करणारा) व नर्तकी सदैव मंचावरच असतात. या मंचाला तमाशाच्या भाषेत 'बोर्ड' म्हटले जाते. गायनाला ढोलकी, कडे, झांज, बाजाची पेटी आणि ट्रँगल यांची साथ असते. तमाशाच्या एका खेळामध्ये गण-गौळण, बतावणी, फार्स, रंगबाजी आणि वग असे पाच प्रकारचे नाट्य असते.

ज्येष्ठ साहित्यिक बशीर मोमीन कवठेकर यांनी तब्बल ५० वर्षे तमाशा सृष्टीला आपल्या लेखणीतून विविध प्रकारचे मनोरंजनात्मक आणि समाजोपयोगी साहित्य पुरवले. लावणी, गण, गवळण, पोवाडे, सवाल जवाब आणि वगनाट्य अशा सर्व प्रकारच्या लेखांतून त्यांनी भरीव असे योगदान दिले. महाराष्ट्र सरकारने त्यांना २०१८ सालच्या "तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे.



गण, मुजरा, गौळण, बतावणी, रंगबाजी, वग हे तमाशातील अविभाज्य् घटक आहेत.या घटकांचे विश्लेषण केल्यास तमाशा हा कलाप्रकार स्पष्ट होतो .


❖गण

❖गौळण

❖सवालजवाब

❖रंगबाजी

❖वग

❖जुन्या काळी गाजलेले वग

❖उल्लेखनीय तमासगीर आणि त्यांचे फड

❖उल्लेखनीय तमाशा मंडळे

तमाशा या विषयावरील मराठी पुस्तके

## गण

गण म्हणजे गणपतीला केलेले आवाहन. तमाशाचा खेळ निर्विघ्न पार पडावा म्हणून तमाशाचा सरदार म्हणजे मालक हे आवाहन करतो, सर्व साथीदार चढ्या आवाजात ध्रुपद आळवतात आणि सुरत्ये ध्रुपदाचा अंतिम सूर झेलून उंचावर नेतात. तमाशाची सुरुवात ही ईशस्तवन अर्थात गण म्हणून होते. आम्ही रसिकांची सेवा करायला सज्ज आहोत मात्र हे ईश्वरा तुझी साथ आणि तुझी आशीर्वाद रुपी सावली आम्हा कलाकारांच्या मस्तकी राहू दे म्हणून त्या नटवराचा धावा करणे हा प्रथम चरणाचा मुख्य हेतू असतो. उदा. रंगमंचाचं पूजन झाल्यानंतर सर्व कलाकार रंगमंचावर येऊन तमाशा रंगतदार व्हावा म्हणून श्रीगणेशाला साकडं घालतात.

आधी गणाला रणी आणा।
नाही तर रंग पुन्हा सुना-सुना ।।धृ।।

म्हणत गणरायाला प्रथम मान दिला जातो. ह्याचा आशीर्वाद नसेल, तर पुन्हा सारा रंग सुना होऊन जातो अशी धारणा या कलावंतांमध्ये आहे

प्रेक्षक खदखदून हसतात. पौराणिक काळाला आधुनिक संदर्भ देऊन केलेला ह्या गौळणी हास्यगण संपल्यावर काही काळ ढोलकी व कडे यांचे वादन होते. ढोलक्याची लय पुरेशी अंगात भिनल्यावर तमाशातील स्त्रियांचे नृत्य होते आणि मग गौळण. गौळणींच्वा विषय असतो श्रीकृष्णाच्या गोकुळातील लीला. नर्तकी या गोपी होतात आणि त्यांच्यामध्ये वयस्कर असणारी एक 'मावशी' असते. या गोपी मथुरेला दूध, दही, लोणी वगैरे घेऊन जात असतात आणि वाटेत श्रीकृष्ण आणि त्याचे सवंगडी किंवा पेंद्या त्यांना अडवतो. या पेंद्याचे काम करणारा बहुधा सोंगाड्या (हास्य कलाकार) असतो. या वेळेस या दोन पक्षांमध्ये जे विनोदी संवाद होतात ते ऐकून  व शृंगार रसाने ठासून भरलेल्या असतात.

## गवळण

प्रेक्षक खदखदून हसतात. पौराणिक काळाला आधुनिक संदर्भ देऊन केलेला ह्या गौळणी हास्यगण संपल्यावर काही काळ ढोलकी व कडे यांचे वादन होते. ढोलक्याची लय पुरेशी अंगात भिनल्यावर तमाशातील स्त्रियांचे नृत्य होते आणि मग गौळण. गौळणींच्वा विषय असतो श्रीकृष्णाच्या गोकुळातील लीला. नर्तकी या गोपी होतात आणि त्यांच्यामध्ये वयस्कर असणारी एक ‘मावशी‘ असते. या गोपी मथुरेला दूध, दही, लोणी वगैरे घेऊन जात असतात आणि वाटेत श्रीकृष्ण आणि त्याचे सवंगडी किंवा पेंद्या त्यांना अडवतो. या पेंद्याचे काम करणारा बहुधा सोंगाड्या (हास्य कलाकार) असतो. या वेळेस या दोन पक्षांमध्ये जे विनोदी संवाद होतात ते ऐकून  व शृंगार रसाने ठासून भरलेल्या असतात.

**गवळण :-**

गणानंतर गवळणींचा मेळा येतो. सार्या गवळणी सजून-धजून मथुरेच्या बाजारला निघालेल्या असतात.

"बाजार मोठा । लवकर गाठा
मथुरेच्या हाटा । चला निघा निघा
वरल्या आळीच्या । चंद्रावळीच्या
फळीला जाऊन ।। सांगा सांगा
यमुना नदीला । येईल भरती
नक्षत्र वरती । रोहिणी मघा
बाजाराला । विलंब झाला
सूर्यबिंब वर । आले बघा
धीटपणाने । माठ सांभाळुनी
घाट यमुनेचा । वेंघा वेंघा
रोकड अनुभवी । अवघड लाघवी
फक्कड भाऊची कवी । मागा मागा"

त्याच्या बरोबर जुनी जाणती म्हणून एक मावशीही असत. मावशीची वेश घेऊन वावरणारा हा कलावंत थोडीशी वेगळ्या धाटणीची भाषा बोलतो. त्यात तमाशाच्या मानाने ‘सभ्य’ वाटणारे विनोद साधले जातात. बाजाराला जाणार्या या गौळणींच्या (गवळणींच्या) वाटेत पेंद्या आणि कृष्ण आडवा येतो. ‘गवळण’ म्हणून देवाची भक्ती करा, मगच तुमची वाट सोडू म्हणत पेंद्या त्यांना दम देतो आणि गवळणी त्याच्यासमोर -

‘थाट करूनी माठ भरूनी
घ्या गं सगळय़ा शिरी,
माठ गोरसाचे शिरी,
आडवा आला तू गिरीधारी
सोड रस्ता हरी,
जाऊ दे बाजारी,’

अश्या प्रकारे विनवणीरुपी गवळण सादर करतात. "पिंजरा" या चित्रपटामध्ये जगदीश खेबुडकरांनी सुद्धा एक अप्रतिम गवळण "दे रे कान्हा, दे रे चोळी आणि लुगडी" लिहली आणि यावर शांताराम बापूंनी संध्या हिच्याकडून काय अप्रतिम नृत्य करून घेतले आहे, ते दृश्य डोळ्यासमोर घ्या ज्यामध्ये संध्या या गव्याबरोबर पाण्यात सखींसोबत जलक्रीडा करतायत

## फार्स

एकेकाळी ग्रामीण भागातील मनोरंजनाचा हुकमी एक्का असलेला तमाशा व त्यातील गण, गौळण, बतावणी आणि फार्स काळाच्या पडद्याआड जाण्यापूर्वी त्यांचे दस्ताऐवजीकरण करण्याचे मोलाचे काम सोपान खुडे यांनी 'तमाशातील फार्सा' हे पुस्तक लिहून केले आहे. 'तमाशातील फार्सा'विषयीची त्यांनी दुर्मिळ अशी माहिती जुन्या जाणत्या तमाशा कलावंतांच्या मुलाखती घेऊन मिळवली आहे. या पुस्तकामध्ये 'फार्सा'बरोबरच लेखकाने गण, गौळण, रंगबाजी, मुजरा, बतावणी आणि वगाविषयी माहिती देऊन, शाहीर पठ्ठे बापूराव, रामा-नामा लबळेकर, सखाराम कोऱ्हाळकर, दत्तोबा तांबे, तुकाराम खेडकर, जगताप पाटील-पिंपळेकर, काळू-बाळू कोल्हापूरकर, दादू इंदुरीकर, किसन कुसगावकर, दगडोबा कोऱ्हाळकर आणि विठाबाई नारायणगावकर यांच्या अल्प परिचयाबरोबरच त्यांनी त्यांच्या तमाशात सादर केलेल्या बतावणी फार्साचे काही नमुनेही सदर पुस्तकात दिलेले आहेत. पुस्तक पुण्याच्या देशमुख आणि कंपनीने प्रकाशित केले आहे. ज्येष्ठ साहित्यिक बशीर मोमीन कवठेकर यांनी लिहिलेले फार्स विविध तमाशा फड मालकांनि संपूर्ण महाराष्ट्रात सादर करून लोकप्रिय केले.

**सवालजवाब[**

मंचावर जर दोन फडांचे (तमाशामंडळांचे) तमासगीर एकाच वेळी असतील तर त्यांच्यांतील सरसनीरस ठरवण्यासाठी त्यांच्यामधे आपाआपसात सवालजवाब होतात. बहुधा पौराणिक कथांवर आधारलेले कूटप्रश्न एकमेकांना काव्यांतून विचारून त्यांची उत्तरे ओळखण्याचा हा कार्यक्रम असतो.

**रंगबाजी**

मंचावर होणारे शृंगारिक लावण्यांचे सादरीकरण म्हणजेच रंगबाजी. मंचावर एकापेक्षा अधिक फडांचे तमासगीर असतील तर त्या रंगबाजीला संगीतबारी म्हणतात. याबरोबरच गायक विविध प्रकारची लोकगीते सादर करतात. ज्येष्ठ लावणी कवी बशीर मोमीन कवठेकर यांनी लिहिलेली बरीच गीते ही दत्त महाडिक पुणेकर यांनी संगीतबद्ध करून आपल्या कार्यक्रमांतून सादर केली. मोमीन कवठेकर लिखित आणि आजही लोकप्रिय असणारी काही लोकगीते :

**छक्कड** : छक्कड म्हणजे आशुक–माशुकांमधील पद्यमय संवाद. पठ्ठे बापूरावांनी छक्कड रचना बरीच केली आहे. या प्रकाराची परिणामकारकता अभिनय व म्हणण्याची शैली यांवर

# वग

वग म्हणजे नाट्यरूपाने सादर केलेली कथा. या कथा पौराणिक, ऐतिहासिक किंवा लोककथा असतात. या कथांमधील संवाद लिखित नसून पात्रांनी ते केवळ स्वतःच्या बुद्धीने म्हणायचे असतात. अधूनमधून समयसूचकतेने शेरे मारणारा सोंगाड्या इथे महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतो. सोंगाड्यामुळेच वगाद्वारे सांगितल्या जाणाऱ्या कथावस्तूला चांगली रंगत येते. सोंगाड्या हा उत्कृष्ट नकलाकार असतो. तो हजरजबाबी असावा लागतो. तो प्रेक्षकांची करमणूक तर करतोच पण त्याचबरोबर समोर घडणारे प्रसंग ही खरेखुरे नसून नाटकी आहेत याची जाणीव करून देणे, त्या प्रसंगाची आधुनिक काळाशी सांगड घालणे, सद्य जीवनावर भाष्य करणे, प्रतिष्ठितांचा दंभस्फोट करणे आणि प्रसंगी सादर होत असलेल्या नाटकाचे विडंबन करणे ही कामेही तो करीत असतो. आपल्या लेखणीने तब्बल पाच दशके तमाशा सृष्टीला वगनाट्य आणि लावण्या पुरवणारे ज्येष्ठ साहित्यिक बशीर मोमीन कवठेकर लिखित खालील वगनाट्ये ही महाराष्ट्राच्या पसंतीस पडली :

इष्कानं घेतला बळी

खापऱ्या चोर

तांबडं फुटलं रक्ताचं

अण्णाभाऊ साठे हे एक झपाटलेले लेखक होते. अवतीभोवती पसरलेले अफाट दु:ख, दारिद्र्य व अज्ञान हेच त्यांच्या चिंतनाचे व लेखनाचे विषय होते. त्यांचे साहित्य विपुल आहे. त्यांचे तेरा कथासंग्रह, तीन नाटके, चौदा लोकनाट्ये, पस्तीस कादंबऱ्या, दहा पोवाडे आणि एक प्रवासवर्णन असे एवढे साहित्य प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या सात कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत. केवळ वीस वर्षांच्या कालावधीत त्यांनी हे साहित्य निर्माण केले.

अण्णा भाऊ हे स्वत: रंगकर्मी होते. त्यांनी केवळ नाट्यलेखनच केले नाही; तर रंगमंचावरील सादरीकरणदेखील केले. अण्णा भाऊंनी वग नाटकांमधूनही स्त्रीप्रश्नाला मध्यवर्तीत्व देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे वगनाट्य भांडवलदारी समाजरचनेत भरडल्या जाणाऱ्या गरीब-शेतमजूरांच्या प्रश्नांची उकल करणारे आहेत.

अण्णाभाऊंच्या वगनाट्यात पोटतिडीक आहे. त्यांची वर्गसंघर्षाची जाणीव सखोल व उत्कट होती. त्यांचा आवाज हा दलित शोषितांचा आवाज होता. दलित हा शब्द त्यांनी व्यापक अर्थाने वापरला आहे. जो जो शोषित व पीडित तो तो दलित! समाजाच्या तळागाळातला माणूस हा त्यांच्या साहित्याच्या विषय होता. तो त्यांच्या वगनाट्य-कथा-कादंबऱ्याचा नायक होता. अन्यायाच्या शृंखला तोडण्याचे आवाहन त्यांच्या वगनाट्यात आहे. अण्णा भाऊंना मार्क्सचे तत्त्वज्ञान प्रिय होते.

जग बदलण्याचे तत्त्वज्ञान त्यांनी या दोन महामानवांकडून घेतले होते. देशातील धनदांडग्यांनी, जातदांडग्यांनी व धर्मदांडग्यांनी ज्यांचे शोषण केले त्या दलितांच्या बाजूने ते ठामपणेडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातला विद्रोह त्यांना लढण्याची प्रेरणा देत होता. घाव घालून  उभे होते. शोषकांवर व त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेवर त्यांची लेखणी आघात करते. कामगारांच्या लढ्यात तिने प्रेरकाचे काम केले. कामगारांच्या लढ्याने त्यांच्या मनात विश्वबंधुत्वाची भावना निर्माण केली होती.

तमाशा कलावीर शाहिरीत आणून अण्णांनी जशी प्रचारकार्याला गती दिली तशी शाहिरी परंपरेला लोकनाट्याची अक्षय किमया दिली. ‘ देशभक्त घोटाळे', ‘खापऱ्या चोर’, ‘पुढारी सापडला’, ‘शेठजीचे इलेक्शन’ आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात लोकप्रिय झालेले ‘माझी मुंबई’ अशी अनेक लोकनाट्य-वगनाट्य लिहून सादर केली .






















तमाशातील काही प्रसिद्ध कलावंत डावीकडून अनुक्रमे पहिली ओळ-भाऊ (मांग) नारायणगावकर : गाजजेले तमासगीर, पठ्ठे बापूरावांचे शिष्य. बापू (मांग) नारायणगावकर : पठ्ठे बापूरावांचे शिष्य, भूतपूर्व राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्याकडून गौरव. उषा चव्हाण : तमाशा, लोकनाट्य व चित्रपट या क्षेत्रांतील कलावंत. शाहीर साबळे : मुक्तनाट्याचे प्रणेते. दादू इंदुरीकर : ढोलकी तमाशातील सोंगाड्या, राष्ट्रपती पारितोषिक विजेता. दुसरी ओळ - संभाजी सातू (खाडे) कौलापूरकर : नावाजलेला ढोलकी तमासगीर. शिवा सातू (खाडे) कौलापूरकर : स्वत:चा तमाशाफड, यांचीच मुले काळू बाळू वग गाजवीत आहेत. भिकुबाई चंदणकर : खानदेशी लावणी–गायिका. किसन कुसगावकर : उत्कृष्ट सोंगाड्या, स्वत:चा तमाशाफड, पठ्ठे बापूरावांचा शिष्य. बाबुराव मारुती (मोकाशी) पुणेकर : मेळे व कलापथके यांत नाच्या पोऱ्या म्हणून उत्कृष्ट काम, दोनशेच्या वर वग लिहिले, स्वत:चा फड. तिसरी ओळ–पांडुरंग आबाजी कुरकुंभकर : प्रसिद्ध तमासगीर, हजरजबाबी सरदार, कवी, स्वत:चा तमाशाफड. दादू तुळापूरकर : नावाजलेला तमासगीर : बकुळा तथा चंचला इस्लामपूरकर : तमाशा व चित्रपट यांतील उत्कृष्ट लावणी-गायिका, शासनाकडून गौरव. रामा संपूजी (कुंभार) वर्धनगडकर : उत्कृष्ट देखणा सरदार, उत्तम गायक, स्वत:चा तमाशाफड, मुंबई राज्य तमाशा परिषदेचे अध्यक्ष (१९५९). कोंडू रामजी पाटील : प्रसिद्ध खानदेशी तमासगीर, स्वत:चा तमाशाफड. चौथी ओळ : कलावती येवलेकर - संगीतबारीतील लावणी-गायिका. बबन काळे : तमाशातील प्रसिद्ध ढोलकीपटू. बाबुराव कुरणकर : पठ्ठे बापूरावांचे शिष्य, स्वत:चा तमाशाफड, पहाडी आवाजातील भेदिक लावणी-गायक व मिठ्ठाराणी वगाचे सादरकर्ते. दगडोबा बापूजी गरुड : तमाशातील नृत्य व लावण्यांचे शिक्षक. लीलाबाई येवलेकर : तंबोरीवर मंद लयीतील लावणीगायनासाठी व शास्त्रशुद्ध रागदारीसाठी प्रसिद्ध.

## जुन्या काळी गाजलेले वग

उमाजी नाईक

तंट्या भिल्ल

मिठाराणी

मोहना-छेलबटाऊ

## उल्लेखनीय तमासगीर आणि त्यांचे फड

काळू-बाळू

पठ्ठे बापूराव

राम जोशी

## विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर

विठ्ठल उमप

होनाजी बाळा

गुलाबबाई संगमनेरकर

Ref: Google



Ref: Google















Ref: Google









Ref: Google

## उल्लेखनीय तमाशा मंडळे[

- ❖आनंद लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖काळू-बाळू लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖दपांडुरंग मुळे यांच्यासह आविष्कार मुळे मांजरवाडीकर लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖भिका-भीमा लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖मंगला बनसोडे लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖मालती इनामदार लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖रघुवीर खेडकरसह कांताबाई सातारकर लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖शिवराम बोरगावकर यांच्यासह बाबुराव बोरगावकर लोकनाट्य तमाशा मंडळ
- ❖हरिभाऊ बडे-नगरकर लोकनाट्य तमाशा मंडळ.

Ref: Google

# पुस्तके
# तमाशा या विषयावरील मराठी

**तमाशा** : कला आणि जीवन (डॉ. सुनील चंदनशिवे)

वगसम्राज्ञी कांताबाई सातारकर - ( डॉ. संतोष खेडलेकर)

तमाशातील सोंगाड्या (भि.शि. शिंदे)

तमाशातील स्त्री कलावंत : जीवन आणि समस्या (डॉ. साधना बुरडे)

तमाशा लोकरंगभूमी (रुस्तुम अचलखांब

तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा (योगीराज बागूल)

रंग नटेश्वराचे (गणपत पाटील)

रांगडी गंमत सोंगाड्याची (सोपान खुडे)

## तमाशा: महाराष्ट्रातील एक रांगडा कलाप्रकार (भाग-२)

प्रमुख दोनच प्रकार असले तरी खानदेशी तमाशा, सादरीकरण पुढील क्रमाने केले जाते. मांडणी ढोलकीचा तमाशा आणि संगीत तमाशा असे तमाशाचे मात्र एकसारखी असते. 'तमाशा' चे

वायदेशी तमाशा, खडी गंमत, कोल्हाटणीचा तमाशा असेही तमाशाचे प्रकार आहेत. प्रत्येकाची सादरीकरणाची पद्धत, बतावणी वेगवेगळी असते. तमाशाची

त्याच्या बरोबर जुनी जाणती म्हणून एक मावशीही असते. मावशीचा वेश घेऊन वावरणारा हा कलावंत थोडीशी वेगळ्या धाटणीची भाषा बोलतो. त्यात तमाशाच्या मानाने ‘सभ्य’ वाटणारे विनोद साधले जातात. बाजाराला जाणार्या या गौळणींच्या (गवळणींच्या) वाटेत पेंद्या आणि कृष्ण आडवा येतो. ‘गवळण’ म्हणून देवाची भक्ती करा, मगच तुमची वाट सोडू म्हणत पेंद्या त्यांना दम देतो आणि गवळणी त्याच्यासमोर -

‘थाट करूनी माठ भरूनी

घ्या गं सगळय़ा शिरी,

माठ गोरसाचे शिरी,

आडवा आला तू गिरीधारी

सोड रस्ता हरी,

जाऊ दे बाजारी,’

अश्या प्रकारे विनवणीरुपी गवळण सादर करतात. "पिंजरा" या चित्रपटामध्ये जगदीश खेबुडकरांनी सुद्धा एक अप्रतिम गवळण "दे रे कान्हा, दे रे चोळी आणि लुगडी" लिहली आणि यावर शांताराम बापूंनी संध्या हिच्याकडून काय अप्रतिम नृत्य करून घेतले आहे, ते दृश्य डोळ्यासमोर घ्या ज्यामध्ये संध्या या गळ्याबरोबर पाण्यात सखींसोबत जलक्रीडा करतायत

# Thanks